
# लॉकडाऊन, शेती आणि शेतकरी!



लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर मंदिर बंद असले तरीही नित्यनेमाने डेअरीला दूध घातल्यानंतर गणपतने बाहेरूनच देवाचे दर्शन घेतले. मागील तीन महिन्यांपासून पारावर बसून गप्पा मारणे बंद असले तरीही गणपत-संपतला दिवसातून एकदा भेटल्याशिवाय चैन कसे पडणार? देवदर्शन आटोपून गणपत थेट संपतच्या मळ्यातील घराकडे गेला. संपतही आपले काम आटोपून सकाळी सकाळी पेपर वाचत बसला होता. गणपतला येताना बघूनच संपत त्याच्या पत्नीला म्हणाला, ''अगं ऐकलं काय, गणपत आलाय. चहा टाक.''

गणपत संपतच्या जवळ बसत म्हणाला, ''का रं संपा लई पेपरात डोकं घालून बसलाय? काही विशेष बातम्या आहेत की त्याच नेहमीच्या- कोरोना किती वाढला, किती बळी गेले आणि कोणती काळजी घ्यावयाची! त्या ठराविक बातम्या ऐकून, वाचून फार बोअर झालं बघ संपा. मी तर आता पेपर वाचायचं आणि टीव्हीवरच्या बातम्या बघायचं बंद केलं.''

यावर संपत हसत म्हणाला, ''हे बघ, कोणत्याही बातम्या, मग त्या पेपरमधल्या असोत की टीव्हीतल्या. आपल्याला जेवढ्या आवश्यक वाटतात तेवढ्या घ्यायच्या. नाही तर सोडून द्यायच्या. जास्त त्रास करून नाही घ्यायचा.'' यावर गणपतनेही मान डोलावली.

''पण मला एक सांग संपा, या लॉकडाऊनमध्ये सर्व काही बंद होते. सर्वजण सुट्टी घेऊन घरी बसले. अर्थात पोलिस यंत्रणा, प्रशासन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे डॉक्टर्स, परिचारिका आणि हॉस्पिटलच्या सर्व यंत्रणा सुरू होत्या. अर्थात या सर्वांनी चांगले काम केले आणि करतात. म्हणून त्यांचे आपण सर्वांनी स्वागत केले आणि आभार मानले. या सर्व यंत्रणांचे अगणित उपकार सर्वसामान्य जनतेवर आहेत हे नाकारता येणार नाही. आपण सदैव त्यांचे ऋणी आहोतच! पण मला हे कळत नाही की, ही यंत्रणा फार तर काही लाखांच्या घरात असेल ज्यांनी करोनाला हरविण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्याबद्दल विविध ठिकाणी मोठमोठ्या बातम्या आल्या, त्यांनी लोकांचे प्राण वाचविले, ट्रीटमेंट दिल्या आणि एकूणच सर्व सामाजिक व्यवस्था नियंत्रणात ठेवली हे ठीक आहे. परंतु ६५ कोटी शेतकरी मात्र घरात बसून नव्हते. त्यांचे तर शेतात दररोज काम सुरूच होते. दररोज दूध काढणे, डेअरीला नेऊन घालणे. पिकांना दररोज पाणी देणे, भाजीपाला- फळे तोडणे, ती मार्केटला पाठविणे. हे सर्व त्याला करावेच लागले फक्त त्यांच्या प्रपंचाला हातभार लागावा म्हणून. परंतु सर्वात महत्त्वाचे

म्हणजे जो समाज संपूर्ण लॉकडाऊन झाला होता त्याला दोन वेळ खाण्यासाठी लागणारे अन्नधान्य, फळे-भाजीपाला, दूध तर त्यांना पाठविणे गरजेचे होते. हे जर नसते मिळाले तर मग इतर यंत्रणांनी कितीही चांगले काम केले असते तर हा समाज घरात शांत बसला असता का? परंतु एवढे करूनही संपा, मला ह्या लॉकडाऊनच्या काळात फार वाईट वाटत होते. ज्यावेळी डॉक्टर, नर्स, सफाई कामगार, पोलिस या 'कोविड योद्ध्यां'वर लोक फुलांचा वर्षाव करत होते त्यावेळी त्यांना एकही शेतकरी सापडला नाही का? ज्याच्यावर फुलांचा वर्षाव करून त्याने दोन टाईम दिलेल्या अन्नासाठी त्याच्याबद्दल कृतज्ञता दाखवावी म्हणून?''

गणपत बोलतच होता आणि संपतही त्याच्याकडे बारकाईने बघत होता. अर्थात गणपतच्या बोलण्यामधील तळमळ संपतला समजत होती परंतु एकच होतं की गणपतने बोलून दाखविले आणि संपतने ते मनातल्या मनात घोळवले.

गणपतला थोडेसे आवरत संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, आजपर्यंत शेतकऱ्यांना, शेतकऱ्यांच्या कामाला समाजाने कधी चांगले मानाचे स्थान दिले आहे काय? तुला तर माहीतच आहे- आज शेतकऱ्यांच्या मुलांना लवकर कोणी मुली देत नाही. सर्वांना नोकरदार पाहिजे. अनेक संकटांवर मात करून शेतकरी शेती करतो. अनेक स्तरांवरचं यश-अपयश पचविण्याची आणि पुढे जाण्याची मानसिक तयारी शेतकऱ्यांनी केलेली असते. त्यामुळे आता लॉकडाऊनमध्ये शेतकऱ्यांचा सन्मान झाला नाही म्हणून तू नाराज होऊ नको. यापूर्वीही अशा अनेक घटना घडलेल्या आहेत. या सर्व बाबी असूनही शेतकऱ्यांनी शेती करायचे, उत्पादन काढायचे आणि देशातील समाजाचे पोट भरण्याचे काम कधी बंद केले आहे काय?''

संपतच्या या बोलण्यावर गणपतने मान डोलावून म्हटले, ''हो मला कळते संपा. मी कोठे म्हणतो की मला शेती करायची नाही? पण आता सरकारबरोबरच ग्राहकांनीही शेतकऱ्यांचा विचार करण्याची वेळ आली आहे. तू तर पाहिलेच ना, लॉकडाऊनच्या काळात अनेक शेतकऱ्यांनी त्यांच्या उभ्या भाजीपाला पिकांत नांगर घातला. फळे तर गावात- शहरात फुकट वाटूनही काही उपयोग झाला नाही. शेवटी उत्पादन तसेच शेतात पडून राहिले. फळे- भाजीपाला यांच्या विक्रीअभावी शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. तरी शेतकरी काही बोलला नाही कारण प्रत्येक क्षेत्रामध्ये करोनाच्या प्रादुर्भावामुळे नुकसान होत असताना शेतकऱ्यांनीसुद्धा हे समजून घेतले.

माझा विषय वेगळा आहे. सर्व क्षेत्रातील काम ठप्प झाले होते. त्यामुळे त्यांचे नुकसान झाले. पण शेती आणि शेतकऱ्यांचे काम ठप्प झाले नव्हते. त्यांचे काम सुरूच होते. तरी त्यांचे नुकसान झाले. याला जबाबदार कोण आणि सर्व सुरू असून झालेले नुकसान कोण भरून देईल? समजा इतर उद्योगांसारखे शेती आणि शेतीपूरक उद्योगही तीन महिने बंद ठेवले असते तर काय झाले असते हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. याची कमीत कमी जाणीव सरकार आणि ज्या सर्वांनी दोन टाईम जेवण केले त्यांना तर झाली असेलच ना? मग या शेती आणि शेतकऱ्यांची हेटाळणी का करता? त्यांना कोठे पाच-पन्नास हजार कोटींचे पॅकेज दिले तर सर्वांच्या पोटात गोळा का उठतो? पण त्याच पोटात अन्न घालण्याचे काम आम्हीच करतो ना? शेतीला उद्योगाचा दर्जा द्या, असे म्हटले जाते. शेतीला अनुदान देऊ नका असे म्हटले जाते. शेतकऱ्यांचे सर्व लाड कमी करा, असे म्हटले जाते. कधी कधी तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर कर लावा, असेही म्हटले जाते. या सर्व बाबी शेतकऱ्याला लागू केल्या पाहिजेत, परंतु त्यासाठी आधी शेतकरी जे पिकवितो त्याची उत्पादन खर्चावर आधारित योग्य किंमत ठरवून त्याच किंमतीला शेतमाल विकण्याचा कायदा झाला पाहिजे. तसेच दरवर्षी महागाई भत्ता वाढतो त्याच प्रमाणात प्रत्येक शेतमालाचेही भाव वाढविले पाहिजेत. हे शक्य होणार असेल तरच मग शेतकऱ्यावर कर आकारणीचा विचार करणे योग्य ठरेल.

ग्राहकांना वस्तू स्वस्त मिळण्यासाठी शेतमालाचे भाव कमी ठेवायचे, ही संकल्पनाच पूर्णपणे संपुष्टात आणली पाहिजे. जे गरीब आहेत त्यांना शासन देतेच ना कमी दरामध्ये; पण ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांना दरवर्षी पगारामध्ये वाढ मिळते. त्यांच्याकडे त्यांच्या गरजा भागवून हौस-मौज करायला पैसा असतो त्यांचा थोडासा जास्त पैसा शेतकऱ्यांच्या खिशात आला तर बिघडते

कोठे? ते महिन्यातून चार वेळा हॉटेल, मॉल-मल्टीप्लेक्सला जातात. आमचा शेतकरी महिन्यातून एकदा तरी जाऊ शकेल काय? तो तिकडे फिरकत नाही कारण त्या पैशांत आपल्या इतर गरजा पूर्ण होतील, असा विचार तो करतो. काही गरजा पूर्ण झाल्या तर कमीत कमी तो कर्जबाजारी तरी होणार नाही आणि आत्महत्या तरी करणार नाही. तेव्हा संपा, माझे एकच म्हणणे आहे, मागच्या तीन महिन्यांत लॉकडाऊनमध्ये शेती, शेतकरी आणि अन्नधान्य उत्पादनाचे महत्त्व याचं महत्त्व समाजाला पटलं आहे की नाही? आणि पटलं असेल तर त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी व्हावा हीच इच्छा.''

खरं तर आज गणपत एवढे काही बोलत होता की संपतला त्याचे ऐकणे आणि मान डोलावणे एवढेच काम होते. अर्थात गणपतची शेती आणि शेतकऱ्यांबद्दलची तळमळ आणि समाजाकडून अपेक्षा या सर्व त्याच्या बोलण्यातून बाहेर पडत होत्या. त्यात तथ्य असल्याने, सत्य आहेत म्हणूनच संपतनेही त्याचे बोलणे थांबवले नाही. ''हे बघ, गंपा, तू म्हणतो ते मला पटले आणि ही वस्तुस्थिती आहे. प्रश्न हाच आहे की, या वस्तुस्थितीची जाणीव समोरच्याला झाली नाही तर आपण त्रास करून घ्यायचा नाही. नाही तर आपल्याला जास्त मनस्ताप होतो. लॉकडाऊनच्या काळात सर्वांना कोरोनाची भीती वाटत होती. कोणतीच गोष्ट घरात येत नव्हती. मात्र दूध, भाजीपाला याला मात्र घरात प्रवेश होता. त्यासाठी सर्वजण जीवाचा आटापिटा करून त्या गोष्टी आणत होते. म्हणजे या वस्तू किती मौल्यवान आणि महत्त्वाच्या आहेत याची जाणीव सर्वांना झाली. याचा अर्थ आता यासाठी ते पाहिजे ते दाम मोजतील असे नाही. मला तर वाटते गंपा, शेतकऱ्यांना आज दामाबरोबरच मानसन्मान आणि मानसिक आधाराची गरज आहे. हे सारं मिळालं तर नक्कीच देशाच्या विकासामध्ये जास्तीत जास्त भर घालण्याचे काम शेतकरी करतील. आज अनेक उद्योगधंदे, व्यवसाय ठप्प झाल्यामुळे देशाची अर्थव्यवस्था कोलमडली आहे. परंतु आपल्या हिंमतीच्या बळावर शेतीला मात्र शेतकरी कोलमडू देणार नाही. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला आधार देण्याचे काम शेतकरी करतील. खरं तर आज शेतीक्षेत्रात गुंतवणूक वाढली तर त्याचा पुढे जाऊन शेती आणि शेतकऱ्यांना पर्यायाने देशाला फार मोठा फायदा होईल. अर्थात हा विचार फार मोठा असून त्यासाठी सर्वांची इच्छाशक्ती पाहिजे. चल गंपा, चहा घे पहिला, पार गार होऊन गेला! शेतातले काम काय चुकणार आहे का आपल्याला?''

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■

---

## लेखकांना आवाहन...

**'पूर्वा कृषिदूत'** परिवाराशी आपण गेली काही वर्षे लेखक या नात्याने निगडित आहात, याचा मन:पूर्वक आनंद वाटतो. (सध्या आपण प्रस्तुत मासिक डिजिटल स्वरुपात प्रकाशित करीत आहोत. ही बहुरंगी ऑनलाईन आवृत्ती आपणास कशी वाटते, ते जरुर कळवा.)

आपल्या लेखासोबत आपला सविस्तर पत्ता मोबाईल नंबरसह नमूद करावा ही विनंती. तसेच आपला पासपोर्ट आकाराचा फोटोही जरुर पाठवावा. आपले लेखन सहकार्य असेच लाभत राहील याची खात्री आहेच; आपल्या नवीन उपक्रमांना तसेच व्यक्तिगत, व्यावसायिक संकल्पांना आमच्या हार्दिक शुभेच्छा.

-: आमचा पत्ता :-

पूर्वा कृषिदूत, एम-११३, एम.आय.डी.सी., अंबड, नाशिक- ४२२०१० (महाराष्ट्र).
email:poorvakrushidoot@gmail.com

**- संपादक, 'पूर्वा कृषिदूत'**